आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – ०६/०४/२०२४ वार – शनिवार

बारामती लोकसभा मतदारसंघात नागरिकांना निवडणुकीच्या अनुषंगानं संपर्क साधण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय परिसरात नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांचा दूरध्वनी संपर्क क्रमांक ०२० २९ ९९ १५ ३८ आणि आचारसंहिता तसंच नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२० २९ ९९ २० ६८ असा आहे. नागरिकांनी निवडणूक विषयक माहिती अथवा तक्रारीसाठी या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन द्विवेदी यांनी केलं आहे.

"१३ मे रोजी होणाऱ्या मावळ लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत आम्ही लोकशाही प्रती जागरूक राहू तसंच जात, समुदाय, भाषा वा इतर कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता निर्भीडपणे मतदानाचा हक्क बजावू " अशी शपथ आकुर्डी इथल्या श्री खंडेराया भाजी मंडईच्या १०५ गाळेधारकांनी घेतली. तसंच या निवडणुकीत १०० टक्के मतदान करण्याचा निर्धारही व्यक्त केला. स्वीपमार्फत जनजागृतीच्या अंतर्गत या कार्यक्रमाचं आयोजन निवडणूक प्रशासनाद्वारे करण्यात आलं.

बारामती जागेबाबत वंचित बहुजन आघाडीनं जो निर्णय घेतला, त्या विरोधात मंगलदास बांदल गेल्यानं शिरुर लोकसभा मतदारसंघासाठी त्यांना दिलेली उमेदवारी आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष  प्रकाश आंबेडकर यांच्या सूचनेनुसार रद्द करण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी पुणे महापालिकेच्या घनकचरा अग्निशमन दल, आरोग्य आणि पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. १२ आणि १३ मे रोजी या विभागातील 80 टक्क्यांपेक्षा जास्त कर्मचारी निवडणुकीच्या कामावर असल्यामुळं शहराचा पाणी पुरवठा, कचरा संकलन तसंच आरोग्य सेवेवरही परिणाम होण्याची शक्यता या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

पुणे महापालिकेच्या दवाखान्यात पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्वावर पाच दवाखान्यांत अत्याधुनिक संगणक प्रणाली सुरू केली जाणार आहे. यामुळं कामकाजात गतिमानता येऊन वेळ आणि मनुष्यबळ वाचेल तसंच कागद-विरहित कामकाज होईल असं आरोग्य प्रमुख डॉक्टर भगवान पवार यांनी सांगितलं.

अनेक ठिकाणी दुष्काळामुळे गोमातेला चारा-पाणी मिळत नाही, यासाठी 'गोमाता चारा खा, पाणी पी आणि सुखी राहा' हा उपक्रम पुणे महाएनजीओ फेडरेशनच्या वतीनं सुरू करण्यात आला आहे.  या उपक्रमाच्या अंतर्गत दौंड तालुक्यातील बोरीपार्धी इथल्या श्री बोरमलनाथ गोशाळा ट्रस्टद्वारे ४५० हून अधिक खिलार, थारपार, गीर जातीच्या गायींना दररोज सुमारे सहा टन पुरवावा लागतो अशी माहिती फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली.

पुणे शहरात दिवसाला 41 सायबर तक्रारीं दाखल होतात. फेब्रुवारी महिन्यात 250 हून अधिक तक्रारींमध्ये 3 कोटींपेक्षा जास्त रुपयांची फसवणूक झाल्याची माहिती समोर आली आहे.  विविध मार्गांनी ऑनलाईन तसंच आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या नावाचा गैरवापर करून आर्थिक फसवणूक केली जात आहे. कारवाईच्या भितीस बळी न पडता अशा फसवणुकीच्या घटनांबाबत नागरिकांनी सायबर पोलीस ठाण्याच्या crimecyber.pune@nic.in या ईमेल पत्त्यावर तक्रार दाखल करावी असं आवाहन पुणे सायबर पोलिसांकडून करण्यात आलं आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या बसमधून तिकीट काढूनच प्रवास करावा. वाहकांनी पोलीस कर्मचाऱ्यांना तिकीट द्यावं आणि तिकीट तपासनिसांनी पोलीस कर्मचारी विनातिकीट प्रवास करत असल्याचं आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, असा आदेश पीएमपीएमएल प्रशासनानं काढला आहे.

राधा अन् कृष्णाचं परिपक्वतेपर्यंत प्रवाहित झालेलं नातं, कुंतीचे कृष्णाशी असलेले अनुबंध तर कृष्णसख्याला साद घालणारी द्रौपदी यांचं भावविश्व 'कृष्णकिनारा.. त्या तिघी..' या

नृत्यनाट्य आणि अभिवाचनाच्या अनोख्या संगमातून उलगडलं. लेखिका अरुणा ढेरे यांच्या ‘कृष्णकिनारा' या साहित्यकृतीवर आधारित वैशिष्ट्यपूर्ण असा हा कार्यक्रम ज्येष्ठ कथक नृत्यगुरू मनिषा साठे, शमा भाटे, ज्येष्ठ भरतनाट्यम् नृत्यगुरू सुचेता भिडे-चापेकर, यांच्या उपस्थितीत कलाकारांनी काल पुण्यात सादर केला.

चिनी खाद्यपदार्थ तयार करण्याची कार्यशाळा यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स संस्थेच्या वतीनं पुण्यात आयोजित करण्यात आली. व्यावसायिक म्हणून चिनी खाद्य पदार्थ बनवताना कशा प्रकारची काळजी घ्यायला हवी, संवाद कौशल्य, विक्री आणि विपणन कौशल्य, उद्योजकता विकास आदींबाबतही या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आलं.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.